आर्थिक वर्ष 2024-25 अखेर जिल्हा परिषद अंतर्गत सर्व विभागांनी करावयाच्या कार्यवाहीबाबत मार्गदर्शन सुचना.

# जिल्हा परिषद जालना
## वित्त विभाग
## परीपत्रक क्रमांक-संकीर्ण-2024-25/03 अंदाज शाखा /412
## दिनांक 25 मार्च- 2025

**प्रस्तावना**

दरवर्षी मार्च महिण्यात अर्थसंकल्पीय अधिवेशनात पुरक मागणीव्दारे व सुधारीत अंदाजपत्रकाव्दारे विविध विभागांना (हस्तांतर योजना, अभिकरण योजना, शासकीय योजना केंद्र व राज्य शासन) निधी उपलब्ध करुन दिला जाते. सदर उपलब्ध झालेला निधी माहे मार्च अखेर कोषागार कार्यालयात विहित कालावधीत देयके सादर करुन निधी आहरीत करणे अनिवार्य आहे. माहे मार्च महिण्यात सादर होणा-या देयकांच्या संख्येत मोठया प्रमाणात वाढ होते. तसेच शासनाकडुन Beams / Bill Portal प्रणालीमध्ये 31- सहाय्यक अनुदाने अंतर्गत निधी आहरीत करण्यास प्रतिबंध लावण्यात येतो तसेच सदर प्रणालीवर ताण येउुन त्या खंडीत होण्याचे व वेग मंदावण्याचे प्रकार घडतात. अशाप्रकारे व इतर काही प्रकारे मार्च अखेर उदभवणा-या अडचणीवर मात करण्यासाठी जिल्हा परिषद अंतर्गत सर्व विभाग प्रमुखानी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी.

01) जिल्हा परीषद अंतर्गत सर्व विभागासाठी वैयक्तीक लाभाचे योजना राबविण्यासाठी व विकास कामासाठी जिल्हा वार्षिक योजना, विशेष घटक योजना, शासकीय अनुदाने (प्रशासकीय विभागामार्फत), आदिवासी उपायोजना क्षेत्र अंतर्गत योजना (DPC, SCP, Gov Grant, OTSP) निधी प्राप्त होतात. त्यानुसार प्राप्त निधीचे देयके तयार करुन वित्त विभागास आहरीत करण्यास तात्काळ सादर करण्याची दक्षता घेणे.

02) सन 2022-23 मध्ये व त्यापुर्वी प्राप्त झालेला निधीपैकी अखर्चित असलेले निधी शासन निर्णय वित्त विभागाचे दिनांक 06/02/2025 अन्वये ज्या कामाच्या निविदा 31/01/2025 पर्यंत पुर्ण झाल्या आहेत फक्त अशा कामासाइी सदर निधी दिनांक 30/06/2025 पर्यंत खर्च करता येईल त्यानुसार विभागाने कार्यवाही करावी.

03) **जिल्हा परिषेदे अंतर्गत सर्व योजनाचे सन 2023-24 चा अखर्चित एकुण निधी/शिल्लक रक्कम रुपये 8468.80 लक्ष असुन सदर निधी दिनांक 31/03/2025 पर्यंत खर्च करणे आवश्यक आहे खर्च न झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी विभाग प्रमुखाची/संबधित कर्मचा-याची विभागाची राहील याची नोंद घ्यावी.**

04) विभागाने आपल्या विभाग अंतर्गत लेखाशिर्ष निहाय आस्थापना/ योजना/ योजन्नेत्तर निधीचे तात्काळ मागणी करुन घ्यावी तसेच आज पर्यंत विभगास प्राप्त झालेली निधी परंतु अद्याप पर्यंत कोषागारातुन आहरीत न केलेला नसल्यास तात्काळ आहरीत करुन घेण्याची कार्यवाही करावी.

Scanned with CamScanner

05) आपल्या विभागाचा आजरोजी प्राप्त झालेला निधी, कोषागारातुन आहरीत केलेला निधी, आहरीत न केलेले निधी याची माहिती पुढीलप्रमाणे संकेस्थळावर बघु शकता. https://mahakosh.gov.in ⇨ BEAMS ⇨ MIS ⇨ Specific Report ⇨ DDO Specific ⇨ DDO CODE 3601003267 ⇨

06) विभागाने सन 2024-25 मध्ये आहरीत केलेल्या निधीचे महालेखाकार नागपुर यांच्या संकेतस्थळावर जाऊन ताळमेळ (reconcillation) घेणे तसेच प्रलंबित उपयोगीता प्रमाणपत्र सादर करणे. ⇨ https://cag.gov.in/ae/nagpur/en/page-ae-nagpur-online-reconcillation ⇨ DDO CODE 3601003267 & Password :- Password@1

07) वित्त विभागात कोषागार देयक सादर करतांना मुळ मंजुर अनुदानाचीप्रत आणि सांक्षाकीत प्रत सोबत सलग्न करण्यात यांवी.

08) विभागाच्या अंतर्गत लेखापरीक्षणामध्ये असे निदर्शनास आलेले आहे की, विभागाने कोषागार आहरीत केलेले देयकाची नोंद म.जि.प. व पं. सं. लेखासंहिता 1968 चे नियम 244 अन्वये नमुना नं. 90 नोंद घेण्यात येत नाही. अचुक प्राप्त रक्कमेचा ताळमेळ घेण्यासाठी नमुना नं. 90 ठेवुन नोंद घेण्याची कार्यवाही करण्यात यावी.

09) माहे मार्च-2025 महिण्यामध्ये दिनांक 29, 30, व 31 या दिनांकास शासकीय सुटया येत असल्याने कोषागाराशी कामकाज करणा-या संबधित अधिकारी - कर्मचा-याचे यांचे रजा अत्यावश्यक / आपतकालीन परीस्थीती शिवाय मंजुर करण्यात येवु नये.

10) तसेच वरील शासकीय सुटया विचारात घेता विहीत मुदतीत व कार्यमर्यादेचे कामकाज सन 2024-25 पर्यंत मुदतीत असलेले कामकाज तात्काळ पुर्ण करण्याची विभागाने दक्षता घ्यावी.

11) आपल्या विभागाकडे प्रलंबति असलेल्या अग्रीमे / स्थायी अग्रीमाची विहीत मुदतीत व कार्यमर्यादेचे दिनांक 31/03/2025 पर्यंत समायोजन करण्याची कार्यवाही करण्यात यावी. या बाबत वित्त विभागाकडुन वांरवार पत्रव्यहार करण्यात येत असुन अद्यापही समायोजन झालेले नाही.

12) विभागाकडे प्रलंबित असलेल्या स्थानिक निधी लेखा/पंचायतराज समिती/महालेखाकार यांचे प्रलंबित असलेल्या परिच्छेदाचे तात्काळ परीपुर्ण अनुपालने तयार करुन परीच्छेद वगळण्याची कार्यवाही करण्यात यावी. याबाबत मा. विभागीय आयुक्त कार्यालय आढावा घसेत असुन प्रलंबित परिच्छेदाचेबाबत नाराजी व्यक्त केली आहे.

13) जिल्हा परीषद अंतर्गत सन 2024-25 माहे डिसेबर अखेर पर्यंत जमा व खर्चाचे ताळमेळ घेण्यासाठी वित्त विभागामार्फत सर्व विभागास पुर्व नियोजन करण्यात आले आहे मात्र अद्यापही कोणत्याही विभागाने ताळमेळ पुर्ण केलेली नाही परीणामी म. जि. प. व पं. स. अधिनियम 1961 चे नियम 135,136 नुसार वार्षिक लेखे अंतिमीकरण व राजपत्र प्रसिदध करण्यास विलंब होतो.

Scanned with CamScanner

14) शासन निर्णय उद्योग व कामगार विभाग यांचे दिनांक 01/12/2016 नुसार विभागाअंतर्गत स्टेशनरी खरेदी / संगणक व त्या अनुषंगाने खरेदी/ व इतर खरेदीचे संचिका दरपत्रकाव्दारे खरेदीस मान्यतेसाठी सादर केल्या जात आहेत. शासन निर्णय उद्योग व कामगार विभाग यांचे दिनांक 24/08/2017 अन्वये शासनाने Gem Portal विकसित केलेली असुन उपलब्ध असलेले साहीत्य त्यानुसारच खरेदी बाबत विभागाने कार्यवाही करणे.

15) **वित्त विभागाचे शासन निर्णय दिनांक** 14/02/2024 **व** 1203/2025 **नुसार शासकीय व अशासकीय कार्यालयांना कोषागार कार्यालयातुन निधी आहरीत करुन जिल्हा निधी मध्ये न ठेवता सदर निधी "आभासी व्यैयक्तिक ठेव लेखा"** (Virtual Personal Deposit Account) **खात्यामध्ये जमा करण्याचे सुचना आहे. त्यानुसार सदरचा निधी वित्त विभागाचे शासन निर्णय ०६/०६/२००८ अन्वये दोन वर्षाची मुदतीत खर्चाची मर्यादा आलेली आहे. कोषागारातुन अहरीत केल्याच्या दिनांकापासुन एक वर्षाच्या आत म्हणजे ३६५ दिवसाच्या सदरचा निधी खर्च करता येईल नंतर सदर निधी खर्च करता योणार नाही याची सर्व विभाग प्रमुख यांनी नोंदघ्यावी.**

16) वरील प्रमाणे विहीत कालावधीत व वित्तीय नियमोचीत कार्यवाही करणे ही विभागाची जबाबदारी राहील याची नोंद घेण्यात यावी.

(राजु सोळुंके)
मुख्य लेखा व वित्त अधिकारी
जिल्हा परिषद जालना

(जगदीश मिनियार), (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद जालना

प्रतिलिपी माहितीस्तव तथा कार्यवाहीस्तव सादर.

01) अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जालना यांना उपरोक्त परीपत्रकाच्या अनुषंगाने आपल्या अधिनस्त असलेल्या विभागाचा आढावा घ्यावा.
02) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद जालना.
03) उप-मुख्य कार्यकारी अधिकारी, (सा) जिल्हा परिषद जालना.
04) उप-मुख्य कार्यकारी अधिकारी, (पं.) जिल्हा परिषद जालना.
05) उप-मुख्य कार्यकारी अधिकारी, (मबाक.) जिल्हा परिषद जालना.
06) उप-मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद जालना.
07) कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद जालना.
08) कार्यकारी अभियंता, (बां.) जिल्हा परिषद जालना.
09) कार्यकारी अभियंता, (ग्रापापु) जिल्हा परिषद जालना.
10) जिल्हा जलसंधारण अधिकारी, जिल्हा परिषद जालना.
11) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद जालना.
12) शिक्षणधिकारी (प्रा) जिल्हा परिषद जालना.
13) शिक्षणधिकारी (मा) जिल्हा परिषद जालना.
14) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद जालना.
15) जिल्हा समाजकल्यान अधिकारी, जिल्हा परिषद जालना.

Scanned with CamScanner